सत्र खटला क्र.१०१/२०२३
शासन वि. रतन
नि.क्र.२७

**अभियोग पक्षातर्फे पुढील सरतपासणी सरकारी वकिल श्री.एस.डी.वरपे यांच्या वतीने**

३. आता मला कलम १६४ फौजदारी प्रक्रिये संहितेप्रमाणे माझा नोंदविलेला जबाब दाखविण्यात आला. तो तोच असून त्यावर माझी सही आहे व त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३२/सा.क्र.१** देण्यात येते. आरोपीला मी ओळखतो परंतू तो आज न्यायालयात हजर नाही.

**उलट तपास आरोपीकरिता विधीज्ञ श्री.आर.बी.लोंढे यांच्या वतीने-**

४. साक्षीदार कलीम तुराब मुंजेवार हे माझे सख्खे भाऊ आहेत आणि अत्ताऊल्ला मुंजेवार पुतण्या आहे. घटनास्थळावरील दोन्ही पंच माझे मित्र आहेत. हे म्हणणे खरे नाही की, नवाब पटेल, उबेद पटेल, गणी चौधरी व इसाक चौधरी हे सुध्दा माझे नातलग आहेत. माझा भाऊ कलीम आमच्या घराच्या बाजूला राहतो.

५. माझी गट क्र.२३२ व २३१/१ हया शेत जमीनी आहेत. गट क्र.२३१/१ या जमीनीचा मी कोठेही उल्लेख केला नाही. गट क्र.२३२ व २३१/१ या शेत जमीनीच्या ७/१२ उता-यावर तक्रारीत नमूद केलेल्या शेडचा उल्लेख नाही. त्याचप्रमाणे त्याचा वेगळा ८-अ उतारा नाही किंवा गाव ग्रामसेवकाने त्याची नोंद घेतल्याचा दस्त नाही. शेत शेजारी जर एकाच गटातील असेल तर त्या ७/१२ उता-यावर त्याचे नाव असते. आरोपीची शेत जमीन माझ्या जमीनीपासून ३०० फुटाच्या अंतरावर आहे व ती जमीन माझ्या गटात नसल्यामुळे आमच्या ७/१२ उता-यावर त्याच्या नावाची नोंद नाही व त्याचप्रमाणे आमच्या शेतीला लागून त्याच्या शेतीचा धुरा नाही. आरोपीची शेती कोणत्या गटात आहे हे मला सांगता येणार नाही.

६. गट क्र.२३१/१ च्या ७/११ उता-यावर नंदकुमार हरिबा कसबे यांनी पाईपसाठी रू.२५,०००/- कर्ज घेतल्याची नोंद आहे. शेड बांधण्यासाठी मी कर्ज घेतल्याची नोंद कोणत्याही ७/१२ उता-यावर नाही. दाखल दोन्ही ७/१२ उता-यावर पिक पेरा सन-२०१६-२०१७ व २०१७-२०१८ या वर्षाचा आहे. सन-२०२०-२०२१ व २०२१-२०२२ या वर्षी मी शेतात कोणते पिक घेतले होते याबाबतचा पुरावा पोलीसांना दिला नाही. या शेतातील शेडमध्ये कोणीही कायम वास्तवास नव्हते.

७. दाखल दोन्ही ७/१२ उता-यावर गणी चौधरी हे लगतचे शेत शेजारी असल्याची नोंद नाही. गट क्र.२३२ मधील ७/१२ उता-यावर माझ्याकडे विहीर असल्याची नोंद आहे. विहीरी व्यतिरिक्त मला दुसरा पाण्याचा स्त्रोत नाही. शेडपासुन विहीर ही ३०० फुट अंतरावर आहे. गणी चौधरी हे २० फुटाच्या अंतरावर माझे शेत शेजारी आहेत. गणी चौधरी यांनी शेतातून मला फोन केला होता. त्यावेळी माझ्याकडे ॲन्ड्राईड मोबाईल होता. मी त्यांच्या फोनचा कॉल रेकॉर्ड केला नाही. गणी चौधरी यांचा मोबाईल क्रमांक मी पोलीसांना सांगितला नाही. मी गणी चौधरी यांनी केलेल्या फोनची स्क्रीन शॉट काढून पोलीसांना तपासात दिले नाही. फोन आल्यानंतर मी १५ ते २० मिनीटात शेतात मोटार सायकलने एकटाच गेलो. वडवळ ते कडमुळी हा एकमेव रस्ता माझ्या शेताकडे जाणारा आहे. मी शेताकडे जात असताना त्या रस्त्यावर आरोपीची भेट झाली नाही. त्या दिवसभरात आरोपीची भेट झाल्याचे मी फिर्याद किंवा जबाबामध्ये नमूद केले नाही. मी शेतात गेलो तेव्हा गणी चौधरी हा शेडजवळ होता. त्यावेळी शेडचे दार बंद होते. गणी चौधरी यांच्या शेतात विहीर आहे. तो आग विजवण्यासाठी काही प्रयत्न करीत नव्हता. त्याच्या अंगावर कोणत्या रंगाचे कपडे होते हे मी सांगू शकत नाही.

८. जळालेल्या वस्तू मी टप्याटप्याने विकत घेतल्या होत्या. त्या वस्तूच्या दुकानातील पावत्या मी पोलीसांना तपासाठी दिल्या नाहीत. जळालेल्या वस्तू माझ्या मालकीच्या असल्याबाबतचा कोणताही पुरावा मी पोलीसांना दिला नाही.

९. त्यातील कपडे, मोटार केबल, पीव्हीसी पाईप १० नग, हिरवे नेट ४ बंडल, स्टार्टर दोन नग, ताडपतरी दोन नग, चार हजार बांबूच्या काठया हे आगीत जळाल्याचे पोलीसांना मी सांगितले होते परंतू सरतपासणीत त्याचा उल्लेख न केल्याचे कारण मला सांगता येणार नाही. कोणत्याही फोटोमध्ये फेरबदल करता येतो. मी दि.०५.०४.२०२१ रोजी मी मा. न्यायालयासमक्ष साक्ष दिली होती. त्यावेळी मी एकटाच होतो. जबाब देण्यासाठी जायचे आहे म्हणून पोलीसांनी सांगितले होते. त्या दिवशी मी पोलीस ठाण्यात १० ते १५ मिनीट होतो. हे म्हणणे खरे नाही की, जबाब

**सत्र खटला क्र.१०१/२०२३**
**शासन वि. रतन**
**नि.क्र.२७**

कसे दयायचा हे मला पोलीसांनी समजावून सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला या तक्रारीच्या अनुषंगाने जबाब दया असे सांगितले. पाण्याचे टँकर नेमके कोणी मागविले याबाबतचा उल्लेख जबाबात नाही.

१०. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने धुरा जाळत असताना शेड लागली परंतू त्याने धुरा न विजविता घरी निघून गेला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पूर्ण.**

**फेर तपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत केले.

स्वाक्षरित/-

(साजिद आ. सैय्यद)

दि.१४.०७.२०२६

अतिरिक्त सत्र न्यायाधीश,

लातूर.